सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

लोकपाल श्री. श्रीकृष्ण भ. पानसे

(निवृत्त प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश)

निकाल दिनांक :०४/०८/२०२६

अपील क्र. ०४

श्री. शिवम हनुमंत ब्याळे,
वय:२४, ३७३ ब, कृष्णा हरदास पथ, तक्रारदार
सदाशिव पेठ, पुणे.

विरूद्ध

विद्यापीठ तक्रार निवारण कक्ष जाब देणार

०१) विद्यापीठ तक्रार निवारण कक्षाने (सोयीसाठी यापुढे विद्यापीठ असा उल्लेख केला आहे.) श्री शिवम हनुमंत ब्याळे, व्यथित विद्यार्थी (याचा पुढे उल्लेख श्री ब्याळे असा केला आहे.) ब्याळे याने शिक्षण प्रसारक मंडळाचे सर परशुरामभाऊ महाविद्यालय (याचा उल्लेख महाविद्यालय) असा केला आहे. यातील तक्रारनिवारण कक्षाने दिलेल्या ०६/०२/२०२६ च्या निकालाविरूद्ध तक्रार दाखल केली. दिनांक २०/०३/२०२६ रोजी विद्यापीठाने त्याचा निकाल दिला. श्री ब्याळे यांनी त्या निकालाविरूद्ध हे अपिल दाखल केलेले आहे.

०२) विद्यापीठाने दिनांक २०/०४/२०२६ च्या पत्राने लोकपाल यांना चौकशीच्या तारखेची विचारणा केली. त्यांनी ०४/०५/२०२६ रोजी चौकशी ठेवावी असे कळवले. त्यानंतर विद्यापीठाने दिनांक ३०/०४/२०२६ च्या पत्राने महाविद्यालय व श्री ब्याळे हे तक्रारी संदर्भात आपसात बोलणी करून मार्ग काढणार असल्यामुळे ०४/०५/२०२६ रोजी सुनावणी न घेता ती स्थगित करावी अशी विनंती केली. लोकपालांनी ती मान्य केली. असेही म्हटले की पुढील तारिख दोघांच्या विनंती वरून देण्यात येईल.

०३) लोकपालांना संबंधितांकडून काही एक न कळवल्यामुळे त्यांनी विद्यापीठाला अपिल सुनावणीसाठी १७/०७/२०२६ रोजी ठेवावे असे फोनवर कळवले. त्याप्रमाणे ते ठेवण्यात आले. त्यादिवशी श्री ब्याळे यांनी वैयक्तिक कारणावरून मुदत मागितली. ती देण्यात आली.

०४) श्री ब्याळे यांनी स्वत: साठी युक्तीवाद केला त्यांनी हेही स्पष्ट केले आहे की त्यांना ज्या ज्या गोष्टी सांगावयाच्या होत्या, त्या त्या लोकपालांनी ऐकून घेतल्या. श्री ब्याळे यांनी लेखी युक्तिवाद कागदपत्रांसहित दाखल केला. रोजनाम्यात त्याचा उल्लेख आहे.

०५) जाब देणाऱ्यांतर्फे डॉ सविता कुलकर्णी, संचालक, विद्यार्थी विकास मंडळ, स. प. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अविनाश मोहरील, उपप्राचार्य, डॉ प्रविण वसंत रणसुरे, मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ अरविंद काकुळते यांनी युक्तीवाद केला. यांनी हे मान्य केले की लोकपालांनी त्यांचा संपुर्ण युक्तीवाद ऐकून घेतला.

०६) श्री ब्याळे यांनी विद्यापीठाने दिलेला निकाल अन्यायकारक आहे असे म्हटले, तो निकाल दि. २०/०३/२०२६ चा आहे. तो खालिलप्रमाणे—

१. महाविद्यालयाने विद्यार्थी तक्रार निवारण समिती, त्याचे सदस्य व तक्रार निवारणाची प्रक्रिया ही महाविद्यालयाच्या दर्शनी भागामध्ये प्रसिद्ध करावी जेणेकरून विद्यार्थ्यासाठी अधिक पारदर्शकपणे माहिती मिळेल.

२. शिवम ब्याळे याला शैक्षणिक वर्ष २०२५—२६ मध्ये महाविद्यालयाने अनुदानित तुकडीमध्ये एम.ए. सायकॉलॉजी साठी प्रवेश दिला. विनाअनुदानित तुकडी व अनुदानित तुकडी याच्या प्रवेश शुल्कामध्ये फरक असल्याने,महाविद्यालयाच्या वतीने माननीय उपप्राचार्यांनी श्री. शिवम ब्याळे याच्याकडून प्रथम व द्वितीय या दोन्ही शैक्षणिक वर्षांकरीता अनुदानित तुकडीचेच शुल्क आकारण्याविषयी सकारात्मकता दर्शविली आहे. त्या अनुसार महाविद्यालयाने त्याच्या व्यवस्थापन समिती मार्फत शुल्काबाबत निर्णय घ्यावा .

३. तसेच महाविद्यालयाने दिनांक २७/०१/२०२६ रोजी श्री. शिवम ब्याळे याला कारणे दाखवा नोटिस पाठविली होती. सुनावणी दरम्यान शिवम ब्याळे याने असे सांगितले की, त्याचा उद्देश कोणाला त्रास देण्याचा नव्हता व त्याने कोणतीही गोष्ट हेतूपुरस्सर केलेली नाही. या सर्व कारणांमुळे ही समिती महाविद्यालयाला निर्देश देत आहे की, सदर विद्यार्थ्याची ही पहिलीच वेळ असल्यामुळे व त्याला एक संधी देऊन सदर कारणे दाखवा नोटिस मागे घ्यावी.

४. सुनावणी दरम्यान ठरल्याप्रमाणे महाविद्यालयाने परीक्षेच्या अनुषंगाने विद्यार्थी हिताचे दृष्टीने आवश्यक तो वेळ, सर्व प्रकारची शैक्षणिक मदत व मार्गदर्शन मिळण्याची व्यवस्था करावी. तसेच या संदर्भातील नोटिस व माहीती वेळेत देऊन विद्यार्थ्याचा परीक्षा अर्ज व परीक्षा शुल्क संदर्भात सर्वतोपरी मदत करावी.

५. वरील बाबींची पुर्तता तीन आठवडयात करून तसे विद्यापीठाला कळविण्यात यावे.

०७) श्री ब्याळे यांनी महाविद्यालयाकडे तक्रारअर्ज ०८/१२/२०२५ रोजी दिला. या अर्जाची सुनावणी १५ दिवसांत केली नाही म्हणून, त्यांनी विद्यापीठाकडे २४/१२/२०२५ रोजी अर्ज केला. विद्यापीठाने दिनांक २७/१२/२०२५ रोजी महाविद्यालयाला निरनिराळया गोष्टी कळवून श्री ब्याळे यांच्या तक्रारीची चौकशी करून अहवाल पाठवण्यास सांगितले.

०८) श्री ब्याळे यांच्या अर्जाची महाविद्यालयाने सुनावणी करण्यापुर्वी काही घटना घडल्या. त्या म्हणजे २२/०१/२०२६ रोजी ते विद्यापीठात आले. त्यावेळी ज्या घटना घडल्या त्याचा उल्लेख करून विद्यापीठाने महाविद्यालयाला पत्र लिहिले. श्री ब्याळे यांनी त्याच दिवशी माजी कुलगुरू श्री वासुदेव गाडे यांना ईमेल केला आणि त्या संदर्भात दिनांक २७/०१/२०२६ रोजी तक्रार अर्ज दिला. महाविद्यालयाने दिनांक २७/०१/२०२६ रोजी श्री ब्याळे यांना कारणे दाखवा नोटीस दिली. त्याचे त्यांनी दिलेले उत्तर दिनांक २९/०१/२०२६ रोजीचे आहे. विद्यापीठाने दिनांक २७/०१/२०२६ च्या आदेशाप्रमाणे दिनांक २७/०३/२०२६ रोजी कारणे दाखवा नोटीस रद्द केली.

०९) श्री ब्याळे यांनी दिनांक ०८/१२/२०२५ रोजी महाविद्यालयात तक्रार निवारण कक्षास जी तक्रार केली त्या तक्रारीतील तक्रारी म्हणजे अ) युजिसी ने घालून दिलेल्या नियमांच्या बाहेर जाऊन काही विद्यार्थ्यांना प्रवेश दिले. ब) अपात्र मुलांना Clinical Psychology हे Specialization देण्यात आले. क) प्रथम अपिल सुनावणी नंतर त्यांना Clinical Psychology व Grant Division दिली गेली हे दुसऱ्या पात्र विद्यार्थ्यावर अन्याय आहे. ड) तपासणी करून इतर विद्यार्थ्यांची नुकसान भरपाई द्यावी.

१०) श्री ब्याळे यांच्या दिनांक ०८/१२/२०२५ च्या तक्रारअर्जाची चौकशी होऊन महाविद्यालयाने दिनांक ०६/०२/२०२६ रोजी जो सुनावणीचा वृत्तांत दिला त्यातील तक्रार निवारण समितीचा अभिप्राय आणि सुचना खालिल प्रमाणे आहेत.

१) एम.ए मानसशास्त्र प्रवेश प्रक्रियेमध्ये सर्व विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात आले.

२) मानसशास्त्र विभागामधून गुणवत्ता यादी मागवण्यात आली व सत्यता पडताळून पाहिली असता सदर विद्यार्थ्याने केलेल्या तक्रारी संदर्भात कोणतेही तथ्य नाही हे निदर्शनास आले. सर्व विद्यार्थ्यांना नियम व अटी यांचे अधिन राहून प्रवेश देण्यात आले.

३)महाविद्यालयाकडे मानसशास्त्र या विषयासंदर्भात विद्यार्थ्याने मागणी केल्याप्रमाणे मानसशास्त्र विभागातील शिक्षकांना अधिकचे तास व प्रकल्प यासंदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी सूचना देण्यात आली असून शिवम ब्याळे याने प्रत्यक्ष शिक्षकाला भेटून त्यांचे मार्गदर्शन व सल्ला घेणे त्यासाठी १५ दिवसांचा कालावधी निश्चिती करण्यात आला आहे व ही बाब शिवम ब्याळे याने मान्य केली आहे.

११) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (विद्यापीठ तक्रार निवारण कामकाजाची कार्यकारी यंत्रणा) एकरूप परिनियम २०१९ मधील नियम २ हा व्याख्या संदर्भात आहे. त्यातील (एक) ''व्यथित विद्यार्थी'' याचा अर्थ, या परिनियमान्वये व्याख्या केलेल्या तक्रारीशी संबंधित बाबींमध्ये ज्या विद्यार्थ्याची कोणतीही फिर्याद असेल तो विद्यार्थी, असा आहे आणि त्यामध्ये उच्चशिक्षण देणाऱ्या कोणत्याही विद्यापीठात किंवा महाविद्यालयात किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेत प्रवेश मागणाऱ्या व्यक्तिचा समावेश होतो. याचाच अर्थ व्यथित विद्यार्थी हा एक आहे. हा समुह नाही. श्री ब्याळे यांच्या अर्जात आणि युक्तिवादात असे म्हणतात की, अनेक विद्यार्थ्यांवर अन्याय झाला, त्यासाठी म्हणून जे दोषी असतील त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी. ही त्यांची मागणी या कामकाजाच्या कार्यक्षेत्रात बसत नाही. महाविद्यालयाच्या २२/०४/२०२६ च्या अहवालात असे म्हणण्यात आले आहे की, ''एम.ए. प्रथम वर्ष (मानसशास्त्र) प्रवेश समितीद्वारे शैक्षणिक वर्ष २०२४—२५ मध्ये ओबीसी आरक्षणाअंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या नियमावलीचा वापर करून ओबीसी प्रवर्गाकरिता विद्यार्थ्यांना प्रवेश देताना सर्व विद्यार्थ्यांच्या नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्राची पडताळणी केली व कोणत्याही नियमांचे उल्लंघन केलेले आढळलेले नाही. कोणताही विद्यार्थी अपात्र आढळलेला नसल्याने प्रवेश रद्द केलेले नाहीत.'' या विधानाला छेद जाईल असा कोणत्याही विद्यार्थ्याने श्री ब्याळे यांच्या प्रमाणे अर्ज केलेला नाही.

१२) श्री ब्याळे यांच्या तक्रारींचा स्पष्ट उल्लेख केला आहे. त्यावरून असे दिसते की, श्री ब्याळे यांची मागणी Clinical psychology या विषयाची होती. ती त्यांना देण्यात आली. त्याशिवाय त्यांना Grant Division ही देण्यात आली. त्यांना जेव्हा त्यांच्या इच्छेप्रमाणे Specialization देण्यात आले, त्यावेळी त्यांनी आता उशीर झाला शैक्षणिक वर्ष वाया जाण्याची शक्यता आहे म्हणून नाकार देता आला असता, परंतू त्यांनी तसे केले नाही.

१३) महाविद्यालयातर्फे युक्तिवादात असे म्हणण्यात आले आहे की, अनुदानित तुकडीमध्ये जागा रिक्त राहिली तर, विनाअनुदानित तुकडीतील गुणवंत विद्यार्थ्यांना अनुदानित तुकडीमध्ये प्रवेश दिला जातो. पहिल्या सत्रांत सर्व मुलांना विषय समान असतात, दुसऱ्या सत्रापासून विद्यार्थ्यांना विशेष विषय (Specialization) सुरू होतात व पुढील सत्रापर्यंत ते कायम राहतात. दुसऱ्या सत्रामध्ये जेव्हा विशेष विषय दिला जातो तेव्हा त्या विद्यार्थ्याला तो स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा पुर्ण अधिकार असतो. शिवम ब्याळे या विद्यार्थ्यांला चिकित्सात्मक मानसशास्त्र (Clinical Psychology) हा विषय हवा होता. परिक्षेच्या नियमानुसार जर त्याने कोणत्याही सत्राच्या मध्यभागी इतर कोणताही विशेष विषय घेतला तर त्याला मागील वर्षाचे राहिलेले विषय नियमित अभ्यासक्रमासह उत्तीर्ण होणे आवश्यक असते. हे नियम बघता केलेले विधान बरोबर आहे. दुर्देवाने श्री ब्याळे त्या विषयात उत्तिर्ण होऊ शकले नाहीत.

१४) श्री ब्याळे यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांच्या कडून पहिल्या वर्षात जी फी घेण्यात आली ती विनाअनुदानीत प्रकारात मोडत होती आणि Clinical Psychology व Grant Division दिल्यानंतर त्यांची फी कमी झाली. त्यामुळे जास्तिचे घेतलेले पैसे त्यांना मिळावयास हवे. युक्तिवादा दरम्यान त्यांनी हे मान्य केले की, जास्तिची रक्कम त्यांच्या खात्यात जमा केली आहे. युक्तिवादा दरम्यान त्यांनी निशाणी २ सोबत दाखल केलेल्या दस्तातील यादीतील २७/०४/२०२६ चे विनाअनुदानित फी परतावा चे पत्र जोडले आहे. त्या पत्रातील उर्वरित फी त्यांना अर्थसहाय्य म्हणून परत देण्यात येत आहे याकडे लक्ष वेधले. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांचा तो अधिकार आहे. महाविद्यालयातर्फे असे सांगण्यात आले की, विनाअनुदानितची फी अनुदानित धरून उर्वरित फी त्यांना अर्थसहाय्य (Non Refundable) म्हणून देण्यात येत आहे. त्यात पुढे असेही म्हटले आहे की, प्रशासकिय कागदपत्राची जबाबदारी महाविद्यालयाची व श्री ब्याळे यांची वैयक्तिक जबाबदारी आहे. ही वस्तुस्थिती आहे की श्री ब्याळे यांच्याकडून महाविद्यालयाने कोणतीही कागदपत्रे तयार करून घेतलेली नाही. या परिस्थितीचा विचार करून यापत्रातील काही शब्द गैर आहे असे मला दिसून येत नाही.

१५) श्री ब्याळे यांचे असे म्हणणे होते की जेव्हा त्यांना Clinical Psychology विषय देण्यात आला, त्यावेळी शिक्षकांचे शैक्षणिक मार्गदर्शन, समुपदेशन व अभ्यास साहित्य देणे आवश्यक आहे. ते त्यांना दिलेले नाही. ते असेही म्हणतात की जेव्हा त्यांना दिनांक १३/०२/२०२६ रोजी, त्याच तारखेपासूनचे वैयक्तिक मार्गदर्शनासाठी वेळापत्रक पाठविण्यात आले ते त्यांना १ मिनिट आधी मिळाले. त्यासंदर्भात त्यांनी महाविद्यालयाला बदल करून मागितले. त्याला महाविद्यालयाने प्रतिसाद दिला नाही. याला उत्तर देताना महाविद्यालयातर्फे प्राचार्यांनी ही बाब नजरेत आणली की ही वस्तुस्थिती आहे की, श्री ब्याळे यांना वेळापत्रक दिनांक १३/०२/२०२६ रोजी तासाच्या काही वेळ आधी मिळाले. परंतू १४/०२/२०२६ पासून जे वेळापत्रक होते त्याला ब्याळे हजर राहीले नाही. शिक्षक वेळापत्रकाप्रमाणे तेथे बसत होते. ते पुढे असेही म्हणाले की, श्री ब्याळे हे अनेक वेळा अनुपस्थित असतात. त्याला उत्तर म्हणून श्री ब्याळे यांनी सांगितल की ते ७५ टक्के पेक्षा जास्त हजर राहत होते त्यामुळे ते परिक्षेला बसू शकले. हे विधान कागदपत्राला धरून असले तरी परिस्थीतीला धरून असणार नाही. त्याचे उदाहरण म्हणजे १३/०२/२०२६ पासून पुढील सर्व तासिकांना ते गेले नाहीत. त्यांनी विभागप्रमुखांना किंवा प्राचार्यांना काहिही कळवले नाही. हे त्यांचे वागणे विद्यार्थी म्हणून विसंगत आहे.

१६) हा युक्तिवाद सुरू असतांना लोकपालांनी प्राचार्यांना विचारले की, श्री ब्याळे यांना मार्गदर्शनासाठी तासिका आणि अभ्यास साहित्य पुरविण्यास तयार आहात का? त्यावर ते हो म्हणाले. त्यानंतर श्री ब्याळे यांना विचारण्यात आले की, तुम्ही मार्गदर्शनासाठी तासिका ठेवल्या तर हजर राहणार का? त्यावर ते हो म्हणाले. त्यावेळी मानसशास्त्र विभागप्रमुख हजर होते. त्याला त्यांनी संमती दिली. त्यांना जे मान्य होते त्याचा उल्लेख रोजनाम्यात करण्यात आला. त्यावर संबंधितांनी सहया केलेल्या आहेत. मान्य केलेला मसुदा म्हणजे

''दोघांच्या संमतीने दिनांक ०६/०८/२०२६ ते १४/०८/२०२६ हे दिवस ठरवण्यात आले त्यातील ०९/०८/२०२६ ही तारिख रविवार म्हणून वगळण्यात आली. तासाची वेळ सकाळी १० ते ११ व ठिकाण मानसशास्त्र विभाग स. प. महाविद्यालय डिस्कशन रूम असेल. प्राध्यापक व श्री ब्याळे हजेरीपत्रकावरती सही करतील. या वेळापत्रकाची परत नोटीस काढण्यात येणार नाही. श्री ब्याळे यांना वैयक्तीक मोबाईल नंबर ९१५६८३५६८७ या व्हाटसॲप मार्फत चिकित्सात्मक मानसशास्त्र या विषयाचे ५ पुस्तकांचे पीडीएफ व २० पीपीटी ०६/०८/२०२६ पुर्वी पाठवण्यात येतील.''

१७) श्री ब्याळे यांनी त्यांचा लेखी युक्तिवाद जो दाखल केला त्या युक्तिवादासोबत त्यांनी महाविद्यालयाने विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष संबंधी जो बोर्ड लावला आहे त्याचा फोटो लावला आहे. कागदपत्रामध्ये महाविद्यालयातील तक्रार निवारण समितींच्या नावांचा उल्लेख असलेला फोटो जोडला आहे. महाविद्यालयाने जो आदेश दिला त्या आदेशाची पुर्तता झालेली दिसून येते. हा जो आदेश आहे हा काढताना तक्रार निवारण समितीने श्री ब्याळे यांच्या हिताचा, शैक्षणिक संस्थेमध्ये शांतता व सामंजस्य रहावे याचा विचार करून काढलेला दिसतो. कागदपत्रांची पाहणी करून दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकून विद्यापीठाने जो हुकूम केला तो कोणत्याही पद्धतीने चुकिचा नाही. म्हणून मी खाली हुकूम करत आहे.

: हुकूम :

०१) श्री ब्याळे यांनी विद्यापीठ तक्रार निवारण कक्षाचा आदेशाविरूद्ध केलेले अपिल नामंजूर करण्यात येते.

०२) परंतू सुनावणी दरम्यान ठरवण्यात आल्याप्रमाणे म्हणजे ''दोघांच्या संमतीने दिनांक ०६/०८/२०२६ ते १४/०८/२०२६ हे दिवस ठरवण्यात आले त्यातील ०९/०८/२०२६ ही तारिख रविवार म्हणून वगळण्यात आली. तासाची वेळ सकाळी १० ते ११ व ठिकाण मानसशास्त्र विभाग स. प. महाविद्यालय डिस्कशन रूम असेल. प्राध्यापक व श्री ब्याळे हजेरीपत्रकावरती सही करतील. या वेळापत्रकाची परत नोटीस काढण्यात येणार नाही. श्री ब्याळे यांना वैयक्तीक मोबाईल नंबर ९१५६८३५६८७ या व्हाटसॲप मार्फत चिकित्सात्मक मानसशास्त्र या विषयाचे ५ पुस्तकांचे पीडीएफ व २० पीपीटी ०६/०८/२०२६ पुर्वी पाठवण्यात येतील'' याची कार्यवाही करण्यात यावी.

14/8/26

लोकपाल

श्री. श्रीकृष्ण भ. पानसे

दिनांक :— ०४/०८/२०२६

ठिकाण :— पुणे